दै. महाराष्ट्र टाइम्स

06 JUL 2017

# शिरोळेंनी केले मुंढेंचे कौतुक

**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपी) व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष तुकाराम मुंढे आणि पालिकेतील सत्ताधारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये वाद पेटला असतानाच खासदार अनिल शिरोळे यांनी बुधवारी मुंढे यांची भेट घेऊन त्यांच्या कामाचे कौतुक केले. मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली पीएमपीची सुरू असलेली वाटचाल चांगली असून, त्यांच्याच कार्यकाळात पीएमपी देशातील सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक होईल, असा विश्वासही शिरोळे यांनी व्यक्त केला.

पीएमपीलच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सेवा सुधारण्यासाठी मुंढे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मुंढे लोकप्रतिनिधींना जुमानत नसल्याची तक्रार करून महापौर मुक्ता टिळक यांच्यासह पिंपरी-चिंचवड पालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षा सीमा सावळे यांनी नाराजी व्यक्त केली होती. पालिकेतील पदाधिकाऱ्यांनी मुंढे यांच्या काम करण्याच्या पद्धतीवर आक्षेप घेतल्याने गेल्या आठवड्यात मुंढे विरुद्ध लोकप्रतिनिधी असा संघर्ष पेटला होता.



अनिल शिरोळे



तुकाराम मुंढे

भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मुंढे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली असताना शिरोळे यांनी मुंढे यांची भेट घेऊन त्यांच्या कामाचे कौतुक केले. मुंढे यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा व पुढील नियोजन याबाबत शिरोळे यांच्याशी चर्चा केली. पीएमपीचे संचालक आणि नगरसेवक सिद्धार्थ शिरोळे या वेळी उपस्थित होते.